श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ५ वें ] चैत्र शके १८४९ [ अंक १

नलिनिदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशक—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

## अनुक्रमणिका.


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महाराजांचे अनुभव | ... | ... | ... | ... | ५९३-६०६ |
| स्फुट विषय. ... | ... | ... | ... | ... | ५५७-५८८ |
| श्री साईसच्चरित | ... | ... | ... | ... | ७७३-७८६ |


## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनोआर्डरीने आगाऊ रु. ३।=. व्ही पी. ने रु. ३॥ फुटकळ अंक ।=. मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

## ग्राहकांस विनंती.

कांहीं अपरिहार्य अडचणीमुळे हा अंक छापविणे लांबला गेला याबद्दल ग्राहकांनीं माफी करावी. यापुढे लीलेचे अंक दुहेरी तिहेरी एकामागून एक याप्रमाणे निघून शिल्लक राहिलेले अंक लवकरच बाहेर पडून ग्राहकांचे हातीं येतील असी खबरदारी घेण्यात येईल. —प्रकाशक

## दोन शब्द.

पाल्हाळ लावून सांगितले काय किंवा दोन शब्दांत सांगितलें काय तात्पर्य तेंच. विलंब झाला खरा. कल्पनातीत झाला त्याला कारणेहीं असणारच परंतु तीं सांगून त्यानें झालेलीं गोष्ट थोडीच सुधारणार ? तेव्हां मुग्धपणानें सुहृद वाचकाच्या सौजन्यावर भिस्त ठेऊन एकदम शरण जाणेच बरें. शरणागताला धोका नाहीं हा अनादि सिद्धांत आहे. श्रीसाईलीलेबद्दल अपत्यप्रेम ठेवणारांकडून तिचा सत्कारच होईल; इतकेच नव्हे पण दीर्घवियोगानंतर भेट झाल्यामुळे प्रेम द्विगुणितहि होईल. यापुढे तीन महिन्याचा एक अंक, पुढच्या महिन्यात प्रसिद्ध होईल व तो वर्गणीदाराकडे व्ही. पी. ने रवाना होईल पुढचे अंक दर महिन्यास तीन अंकाचा एक असे निघून वर्ष पुरे करूं पुढील अंकांत नेहमीचे विषय येतीलच. त्याशिवाय श्रीसाईनाथ महाराजांचे गद्य चरित्र, श्रीनृसिंह महाराज पाचलेगांवकर यांची सचित्र माहिती, ज्योतिर्लिंग औंढ्या नागनाथाची यात्रा, ह. भ. प. दासगणूंचे आख्यान, नारद भक्तिसूत्राचें विवरण वगैरे विविध विषय क्रमशः येतील. आश्वासनापेक्षा कृतीनेंच विश्वास संपादन करूं अशी उमेद आहे.

## श्रीसाईनाथायनमः ।

रा रा. संपादक " श्रीसाईलीला " यांस सा. न. वि. वि.

श्रीसाईलीलेच्या गेल्या फाल्गुन महिन्याच्या अंकांतील श्रीसाईलीलेचे चालक यांची श्रीसाईभक्ताजवळ केलेली महाराजाच्या अनुभवाची मागणी वाचून खालील अनुभव पाठवित आहे. इतके दिवस असे वाटत होते कीं, आपण जर आपले अनुभव प्रसिद्ध केले तर इतर लोक आपणांस हिणवून म्हणतील कीं, " काय मोठे हे भक्त कीं ह्यांनाच अनुभव प्रत्ययास येतात व म्हणून प्रसिद्ध करतात; दुसऱ्या कोणास जसे कांहीं अनुभव येतच नाहींत." पण ह्या टीकेकडे मुद्दाम दुर्लक्ष करण्याचीच पाळी आली आहे. कारण जर निंदेच्या भीतीने महाराजांचे चमत्कार प्रसिद्ध केले नाहींत तर महाराजाचे चमत्कार लोकांपासून दडवून ठेवण्याचे पातक लागेल. म्हणून खालील अनुभव श्रीकृपेनें लिहीत आहे. असो.

१ मुंबईत माझ्या धाकटया भावास, तो चार पांच वर्षांचा असतां आजारांत आंकडी येत असे. एकदा असाच त्यास तीन चार दिवस पुष्कळ ताप येऊन आकडया येऊ लागल्या. डॉक्टराचे औषध चालूच होतें. रोज दोन तीन वेळ डॉक्टर येत असत अमावास्येचा दिवस होता. त्या दिवशीं त्यास फार आकडया येऊन त्याचे हातपाय वगैरे थंड पडू लागले. डॉक्टराने सुद्धा जवळ जवळ आशाच सोडली होती. पुष्कळ उपाय केले तरी आंकडया थांबत नाहींत असे पाहून शेवटीं डॉक्टराने एक निर्वाणीचा उपाय म्हणून त्याच्या कानशिलाजवळ औषधाच्या काडीने डाग दिल्यासारखे केले व जास्त वेळ बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं असे पाहून निघून गेले आमच्या घरची सर्व मंडळी जवळ होती. भावाच्या डोळयाच्या काचा बनूं लागल्या होत्या. तेव्हां आमच्या आईने शेवट उपाय म्हणून श्रीसाईमहाराजाचें तीर्थ त्याच्या तोंडांत घातले. त्याबरोबर त्याने एकदम डोळे उघडून किलकिले केले व म्हणाला " साईबाबा मला पांग्या हाक मारतात. " ( आम्हीं पूर्वीं शिरडीस गेलों होतों; त्या वेळेस श्रीसाईमहाराजांनीं त्यास "पांग्या" असे पदरच्या नांवाने हाक मारून एक आंबा दिला होता. ) त्या वेळीं आम्ही आश्चर्यानें

थक्क झालों, व बाबास शरण गेले असता कशा तऱ्हेने ते मदत करतात हें दिसून आले.

२ एकदा नेहमीप्रमाणे आम्ही उपनगरात राहण्यास गेलो होतों तेथे राहण्यास गेलो तरी एक दोन दिवसानीं कोणी तरी आमच्या घरचें मुंबईंत काहीं कामासाठीं येत असे. एके दिवशीं असाच आमच्या घरचा इसम मुंबईंत आला होता. मुंबईंतील सर्व काम आटपून परत जाताना याच्या हातून दरवाजास कुलूप घालण्याचे राहून गेले व त्यामुळे दार उघडे राहिले. दुसऱ्या दिवशीं पुनः आमचे वडील मुबईत काहीं कामासाठीं आले असतां घरीं गेले आणि पहातात तो दार उघडें. त्यांस वाटले कीं आत खास कोणीतरी चोर असला पाहिजे. व त्यानेच दार तोडून आत शिरकाव केला असला पाहिजे. म्हणून वडिलानीं आत शिरताच सामान वगैरे नीट पाहिलें तों त्यास काहींच तसे दिसून आले नाहीं. चौकशी अंतीं असे आढळून आले कीं आदल्या दिवशीं जो इस[illegible]तून कुलूप लावण्याचे राहून गेले होते व त्यामुळे [illegible]. असो. मुंबईसारख्या शहरात दिवसाढवळ्या घ[illegible]निधोकपणें आत शिरून चोरी करतात, तेथे एकाद्या[illegible] एकादे घर सबंध दिवस, व रात्र उघडें मिळाले अस[illegible]शपणे सर्व लुटून नेले असते; पण असे व्हावयाचें [illegible]त्यास कोण मारी' ह्याप्रमाणे आमच्या जिन्यावर श्री[illegible]र टांगलेली आहे. अशी कीं ती खालून रस्त्यावरून [illegible] रात्रींसुद्धां महाराजानींच घर राखिले व आम्हावर [illegible]मर टाकली.

३. मुबईंत आम्ही दुसऱ्या [illegible]तों. आमच्या शेजारील गाळ्यात दुसरे भाडोत्री न[illegible]टच्या मजल्यावर एकटेच असूं. एकदां आम्हीं [illegible]काच्या लग्नसमारंभास दारास कुलुप लावून [illegible] वेळ होती. आमच्या पश्चात् एक चोर कुलुप [illegible] होता. त्यानें कुलुपावर चीनीने इतके वार केले होते कीं एरवीं त्याच जातीच्या कुलुपाचे

सुद्धां सहज फुटून भाग पडले असते पण महाराजांच्या कृपेनेच त्यास त्याच्या प्रयत्नांत यश आले नाहीं. व चोरानेही खालील मजल्यावर कोणाची चाहूल ऐकून आपले काम आटोपते घेतले. अशा रीतीने ह्या खेपेसही आमच्या घराचे राखण केले ह्यानंतर आम्ही घर बंद करून जात होतों पण ह्यापुढे महाराजांच्या कृपेने तसे काहीं घडले नाहीं.

४. माझ्या मोठ्या भावास दुखणे लागले होते, त्याकरिता आम्हीं हवा पालटण्यासाठीं खडकीस गेलों होतों औषध पाणी वगैरे सर्व पथ्य चालू होते आम्ही तेथे असताना आमच्या वडिलास ताप आला व त्या तापाच्या संसर्गाने माझ्या भावासही त्या दुखण्यात तापाने पछाडिले आधींच तो फार अशक्त झाला होता व त्यांत हा भयंकर जोराचा ताप. डॉक्टर दिवसा रात्रीं बारा वाजेपर्यंत पाच सहा फेऱ्या घालीत असत. त्या दिवशीं सध्याकाळीं जातांना त्यास प्रकृतीविषयीं विचारले तेव्हां असे सांगितले कीं, " माझ्या पश्चात् काय होईल ह्याविषयीं सांगवत नाहीं, आतां त्यांस टोचून औषध घातले आहे, पण हृदयाच्या अशक्तपणामुळे ते केव्हां बद पडेल ह्याचा भरंवसा नाहीं. " आम्हीं सर्व घाबरून गेलों. वडिलांस तर आंगांत जोराचा ताप. एका घरात अशा रीतीने दोन इसम आजारानें पछाडिले होते. ह्या वेळेस काय करावें हे सुचेनासे झाले. भावाच्या आगांत ताप होता तरी त्याची शुद्धी गेली नव्हती. जेव्हा त्यास समजले कीं आपले दुखणे भारी आहे तेव्हां त्यानें श्रीस बिछान्यावरच हाताच्या खुणेने नमस्कारासारखे करून प्रार्थना केली कीं, " बाबा मला दुखण्यांतून पार पाडाच. " आम्हीं सुद्धा श्रीमहाराजाच्या फोटो जवळील नदादीपांत तूप घालून श्रींची मनोभावाने प्रार्थना केली व चमत्कार असा कीं दुसऱ्या दिवसापासून वडिलांचा व भावाच्या आजाराचा जोर कमी होऊन कांहीं दिवसानंतर वडील बरे झाले व भाऊ पूर्ववत् हिंडू फिरूं लागला. अशा रीतीनें श्रीसाईवर निष्ठेने भार टाकिला असतां ते कशा रीतीने आपली काळजी घेतात ह्याचें प्रत्यंतर आम्हांस पहावयास सापडले.

' बाबांचा सेवक '

## श्रीसाईनाथ प्रसन्न.

सप्रेम शि. सा. नमस्कार वि. वि. खालीं नमूद केलेल्या दोन गोष्टी आपल्यास योग्य वाटल्यास श्रीसाईलीलेत प्रसिद्ध कराव्या अशी नम्र विनंति आहे.

### बाबांच्या आमचे घरीं आगमन.

पूर्वी आम्हांला महाराजांबद्दल मुळींच कांहीं माहिती नव्हती. फार तर काय, त्याचे नांवही आमच्या कानीं आले नव्हते. पण आठ दहा वर्षांपूर्वी एकदां आमच्या मातोश्रीनीं महाराजांचा फोटो मात्र एकाचे घरीं पाहिला व त्याचेकडून थोडीशी माहितीही पण कळली. त्यावरून आपलेही घरीं बाबांचा फोटो असावा अशी इच्छा उत्पन्न झाली. म्हणून मातोश्रीने त्यांचेकडे फोटो असल्यास एक मागितला परंतु त्याचेजवळ नसल्यामुळे निराशा झाली महाराजांची आमचे गरीबाचे येथे राहण्याची इच्छा नसल्यामुळेच आम्हाला फोटो मिळाला नाहीं अशी स्वतःच्या मनाची समजूत करून मातोश्री घरीं निघून आली. तिला धार्मिक पुस्तके वाचण्याचा नाद असल्यामुळे ती नेहमीं प्रमाणें "सूक्तिरत्नावली" हातीं घेऊन बसली. मनुष्याचा हा साधारण नियम आहे कीं एखादे पुस्तक हातीं लागले कीं प्रथम ते चाळून पाहावयाचे. त्याप्रमाणे तिने ते पुस्तक एक दोन वेळा चाळून पाहिलें व मग वाचण्यास सुरवात केली. एके दिवशीं सहज वाचता वाचतां तिला बाबांची एक मधून दोन तुकडे झालेली छबी ( छोटीशी ) त्यात सापडली. ती छबी दृष्टीस पडतांच नमन करून लागलीच एका जाड कागदावर नीट बरोबर ठेऊन चिकटवून घेतली व तिला मढवून देवाच्या देव्हाऱ्यांत बसविली. व त्या छबीची आज पावेतों पूजा होत आहे व पुढेही होत राहाणार. आम्हां र्स्वांना बाबाच्या या अकल्पित आगमनानें अत्यंत आनंद होत आहे. बाबा असे गुप्तपणाने त्या पुस्तकांत कितीतरी दिवस राहिले असतील. बाबांची आमचेवर खरोखर किती विलक्षण कृपा आहे हे आज त्याच्या गुप्त आगमनानें स्पष्ट सिद्ध करून दाखविले. आमचेवर सदोदित त्या करुणामय साई माउलीची अशी कृपा असावी अशी आम्हां सर्वांची हात जोडून महाराजांस विनंति आहे. त्याना आम्हां सर्वांचा काय पण सर्व विश्वाचा शतशः नमस्कार असो

## मला उदीबद्दल आलेला अनुभव.

मी नेहमींप्रमाणे सुटींत छिदगावला गेलों. त्या वेळीं मजजवळ बाबांचा फोटो व शिरडी येथील उदीची डबी होती. एके दिवशीं तेथील सोलकण नामक शेतकरीण माझे मातोश्रीजवळ येऊन म्हणाली कीं, बाईसाहेब, माझे घरीं माझ्या पतीला दोन दोन, तीन तीन मिनिटानीं जोराच्या उचक्या येऊन अत्यंत त्रास होत आहे, बेचैन आहे, तर आपण मला कांहीं औषध द्यावे. मातोश्रीनीं औषध माहित नसल्यामुळे माझे जवळ नाहीं म्हणून उत्तर दिले. ती खिन्न मुद्रा करून उदास व निराश होऊन घरीं जाण्यास उठली खरोखर तिची अवस्था पाहून बाबांना वाईट वाटले व मला उदी देण्यास प्रेरणा केली. माझे मनांत उदी देऊन पाहावे असा विचार येतांच तिला थांबण्यास सांगून मी उदी देण्यास आंत गेलों. महाराजांच्या फोटोजवळील डबींतून उदी घेऊन एक पुडी बांधली व बाबास लवकर गुण येण्याबद्दल प्रार्थना करून ती पुडी तिच्या हातावर ठेवली व पाण्यांत कालवून पाजण्यास सांगितले. ती घरीं जाऊन पाहते तों पूर्वीप्रमाणेच उचक्या येऊन त्रास होत होता उदी पाण्यात कालवून त्याला पाजली. बाबाची लीला अगाध आहे. उदी पोटात जाण्या-बरोबर उचक्या एकदम थांबल्या. बाबाच्या उदीच्या अंगीं येवढे अद्भुत सामर्थ्य पाहून आम्हां सर्वांना व त्या उभयताना अत्यंत आश्चर्य वाटले. उदीच्या अंगीं येवढें मोटे सामर्थ्य तर प्रत्यक्ष बाबांच्या अंगीं काय असेल याची आम्हां पामरांना मुळींच कल्पना देखील नाहीं.

भक्तांना कल्पवृक्षासारख्या साईनाथा, खरोखर तू या भूतलावर अवतार घेऊन, गरीब लोकांना आपलेकडे वळवून त्यांना या भवरूप साग-रातून परतीराला पोंचविशील यात मुळींच शंका नाहीं. पण भक्ति व विश्वास त्यांच्या ठायीं असला पाहिजे.अशा करुणामय दीनवत्सला साईनाथा, आम्हाला संकटांतून मुक्त करून आमचे ठायीं भक्ति लावून आम्हांला सुमार्गाला लाव अशी कर जोडून गुरुराजा. तुला प्रार्थना आहे. आमचेवर मेहरनजर असूं दे. येवढीच दिनवाणीने प्रार्थना करून सर्वजण शिरसाष्टांग नमस्कार करून ह्या आनदी अनुभवास पूर्ण करितों व आपली रजा घेतों असो.

आपला, बाबाच्या दासापैकीं

**' एकदास '**

# श्रीसद्गुरु उपासनी-साईनाथ प्रसन्न.

सोलापूर
ता. १७।४।२७

श्री. कृपासागर रा. रा. अण्णासाहेब दाभोळकर यांना गोविंद धोंडो पानसरे याचा शिरसाष्टांग नमस्कार. वि. वि. श्रींचे अनुभव खालीं लिहितो. योग्य वाटल्यास छापावे नाहीं तर आपले मर्जीप्रमाणे करावे.

मी सन १९१२ सालीं मराठी सातव्या इयत्तेच्या परीक्षेस बसलों. त्या वेळीं भगवंत रामचंद्र क्षीरसागर हे साईबाबाकडे येत होते व त्यांचे घरीं श्रीसाईबाबाचा फोटो होता. त्याची पूजा मी करीत असे तेव्हा ते बोलले कीं, श्रीसाईबाबांना परीक्षा पास होण्याबद्दल नवस कर म्हणजे परीक्षा पास होईल. त्याप्रमाणे मी नवस केला कीं परीक्षा पास झाल्यावर कोपरगावापासून शिरडीपर्यंत चालत येईन. परीक्षा पास होण्याची खात्री नव्हती. गणित विषयात १० पैकीं ५ मार्क मिळतील असें वाटत होते. तरी श्रीबाबांनीं काय खेळ केला तो त्यांचा त्याना माहीत. परीक्षा त्याच वर्षी पास झाली. व नौकरी लागली पुढे सन १९१४ जानेवारी महिन्यांत श्रींचे भेटीचा योग आला. रा. रा. भगवंत रामचंद्र क्षीरसागर हे म्हणत तूं व मी पुढे रामनवमीस जाऊं परंतु श्रींचे आकर्षण झाले कारणाने त्यांचे बरोबर थोडे रागावून मी शिरडीस जाणार. रजा द्या अगर नका देऊं. मी उद्यां जाणार मग ते म्हणाले मी तुला पैसे देतों तू सोमवारपासून रजा घे. कबूल केले व लागलींच शनिवार ता. १७।१।१४ रोजीं रात्रीचे गाडीने निघालों व रविवारीं ४ वाजता दुपारीं शिरडीस आलो. मशिदीचे पायरीवर पाय ठेवून दोघांची दृष्टादृष्ट झाली व माझेकडे पाहून श्री बोलले, "काय चैन पडले नाहीं ? कोठून आलां, काय करता," असे विचारले. मी म्हणालों सोलापुराहून आलों. तुम्ही दिलेली मास्तरची नौकरी करतों. ते बोलले मी नौकरी दिली नाहीं, ईश्वराने दिली. पुढें १९१५ नोव्हेबर मध्ये मी व विष्णु श्रीपाद कुलकर्णी मिळून शिर्डीस गेलो. त्या वेळीं दोघांपासून जे काय होतें ते मागून घेतले. पुढे विष्णु श्रीपाद

कुलकर्णी यांना परवानगी दिली. त्यांना कोपरगांवचे तिकीट काढून दिलें. मी मात्र राहिलों. माझा क्रम राधाकृष्ण आईकडील काम संपवून श्रींचे जवळ बसावयाचे. बापूसाहेब याचा व माझा ऋणानुबंध काय असेल तो त्यांना माहीत. ते मला म्हणत, मास्तर, पोथी ऐकण्यास बसा. त्या वेळीं मी बसत नाहीं असे बोललों. एके दिवशीं सकाळीं बाबानीं पांच फुले दिलीं व हीं बापूसाहेबाना दे असें सांगितलें त्याप्रमाणे केले. तेव्हां बापूसाहेब म्हणाले, तुमचा कान सोनाराने टोंचला तुम्हास उदीचे वेळीं ओळख मिळेल असे बोलले त्याप्रमाणे उदी घेण्याचे वेळेस बाबा बोलले, "पोथी वाचायला नको, ऐकायला नको. उठतो तो येथे येऊन बसतो." तेव्हांपासून पोथीला बापूसाहेबांपाशीं बसूं लागलों.

पुढें सोलापुरास जाण्यास निघालो. जवळ दिडकी नाहीं. श्रींनीं आज्ञा दिली. सर्वांकडे पैसे मागितले पैसे मिळाले नाहीं. बापूसाहेबानीं कोपरगांवास दुकानदारास पैसे मला देण्याबद्दल लिहिले. त्यानेही दिले नाहींत. मग तसाच बिन तिकीटानें गाडींत बसून दोंडपर्यंत आलो. दोंडचे स्टेशनवर कोणीं विचारलें नाहीं. दौंडला भाऊ गोपाळ खराडकर यांची माझी भेट झाली. त्यांचे पासून २ रुपये घेतले. सोलापुरचे तिकीट काढले. व मग पुढे माझे तिकीट चेकींग करण्यास तिकीट कलेक्टर आला.

श्री

रा रा. संपादक श्रीसाईलीला,

सा न वि. वि. श्रीसमर्थांच्या चरणीं मी माझ्या अनुभवाची तिसरी माला अर्पण करीत आहे सवडीनुसार श्रीसाईलीलेच्या अंकात जागा मिळेल अशी आशा आहे.

सन १९२१ सालीं माझी बदली ऐन बरसातींत मनासे महालीं झाली. त्या वेळीं सर्व अडचणी सोसून मला नौकरीवर रुजू होणे भाग झाले. व तेथे पोंचल्यावर माझी कन्या 'प्रेमा' ही मलेरियाने बिमार पडली. तिला दवाखान्यातील औषध मी देऊं लागलों, परंतु औषध नित्य देत असताही ती दिवसेदिवस खगत चालली व जी शरीराने गुलगुलीत होती ती केवळ अस्थिचर्माचा डोलारा होऊन बसली. व पुढे काहीं दिवसानीं तर तिचें बोलणेंही बंद होऊन ती एकसारखी इकडून तिकडे तडफडत लोळूं लागली. तिला काय होत होतें तेही तिला सागण्याची ताकत नव्हती. डॉक्टरसाहेबास बिमारीचा हाल विदित करून औषधाची योग्य योजना करण्याबद्दल नम्रतेने प्रार्थना केली, तर आमच्या शास्त्रात तुम्हास बोलतां येत नाहीं, जे औषध दिले जात आहे तेच योग्य आहे असा अधिकारयुक्त जबाब मिळे. सरते शेवटीं त्यांच्या ट्रीटमेटचा तिरस्कार येऊन मी त्यांची रजा घेतली व वैद्याचे औषध देणे सुरू केले. परंतु फार दिवस डिप्लोमाधारी डॉक्टरसाहेबाच्या कुचंबणींत राहिल्याने बिचाऱ्या वैद्याचे हातास यश येईना व मुलीस असह्य वेदना होऊं लागल्या. माझी पत्नी आपल्या पोटच्या गोळ्याजवळ रात्रंदिवस बसून अश्रु ढाळीत असे व मनात श्रीसमर्थांचा दुःख निवारण करण्याकरता धांवा करीत असे. असे होता होता एके दिवशीं धांवा करीत असतां तिच्या कानावर असे शब्द पडले कीं,मुली,"घाबरू नकोस. आजपासून तिसऱ्या दिवशीं हे अरिष्ट दूर होईल." हा दृष्टांत दुसरा कोणाचा नसून श्रीसमर्थ बाबाचाच आहे असे तिला वाटून तिने मोठ्या प्रेमाने तो मला

सांगितला. पण पुढे तिसरे दिवशीं असे झाले कीं, प्रेमाची सर्व हालचाल बंद पडून तिने डोळे मिटले व नाडीही हातास लागेना. तेव्हा अर्थातच ती गतप्राण झाली असे पाहून तिची आई आक्रोश करू लागली व मला म्हणू लागली कीं काहो बाबाचे शब्द असत्य का झाले ? त्यावर मी तिची कशीतरी समजूत घालून आपल्या कर्माचीं फळे आपल्यास भोगलींच पाहिजेत, सर्व गोष्टींत श्रीसाईबाबावर भार घालणे ठीक नाहीं असे म्हणालों व तिच्या मांडीवरून मुलीस माझ्या माडीवर घेतली व लागलीच माझ्या मनांत अकस्मात प्रेरणा झाली कीं, ह्या मुलीस गंगोदकांत बाबांची उदी कालवून पाजावी. व ती कल्पना मी माझ्या पत्नीसही सांगितली. तें ऐकून तिनें तात्काळ मला म्हटले कीं, तुम्ही उदी कोणास पाजणार ? जिला पाजणार ती आतां सजीव नाहीं मातीस पाजून काय होणार ? तेव्हा मी तिला समजावून सांगितले कीं, काय असेल ते असो माझी इच्छा तर हिला गंगोदकांत उदी द्यावी अशीच होत आहे. आता गंगोदक नळीखालीं नच गेले तर तिच्या अंगावर तर सांडेल. तेवढें काय कमी आहे ! कसेही कर व मला गंगा व उदी आणून दे. असा माझा दुराग्रह पाहून तिने गंगोदक व समर्थाची उदी मजजवळ ठेवली. मी लागलीच लहान चमच्यांत गंगोदक घेऊन त्यात उदी घातली व एक एक बूंद करून मुलीची दातखिळी उचटून तिच्या तोंडात घालूं लागलो. असे करता करतां सरासरी पाव चमचा गंगोदक तिचे तोंडांत रिचवल्यावर तिने मिटलेले डोळे किलकिले करून ती मजकडे पाहूं लागली. हे पाहताच मी माझे पत्नीस हांक मारून म्हणालों कीं, तू रडूं नकोस. श्रीसमर्थांचे वचन असत्य नाहीं. तूं शांत हो व मुलीच्या डोळ्याकडे पहा म्हणजे तुझी प्रेमा पुनः सजीव झाली आहे असे तुला दिसेल. ते ऐकून माझ्या पत्नीने शांत चित्ताने मुलीकडे पाहिल्यावर मुलगी डोळे किलकिले करून पहात आहे अशी तिची खात्री झाली व दुःखाश्रूंच्या ऐवजीं तिच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहूं

लागले. नंतर थोडा वेळ पावेतो मी त्या मुलीस एकसारखा उदी मिश्रित गंगोदक पाजितच राहिलों व सुमारें अर्ध्या तासानें ती थोडी हालचालही करूं लागली. त्या बाबांच्या उदीरूपी संजीवनीनेच तिचे सर्व दुखणे बरे होऊन सुमारें दोन महिन्याचे आंत ती चांगली हिंडू खेळूं लागली व त्याच प्रेमीचा विवाह श्रीसमर्थांनी याच वर्षी ता. १ जून रोजीं येथे निर्विघ्न सिद्धीस नेला. खऱ्या प्रेमाच्या हांकेसरशीं संकटसमयीं दीननाथ भक्तवत्सल श्री साईबाबा कसे धाऊन आले व कशा युक्तीने संकट निवारण केले तें वरील हकीकतीवरून सद्भक्तांना जाहिर होईलच. आतां सरते शेवटीं ' वेडे वांकुडे गाईन । दास तुझा म्हणवीन ।। अशी समर्थ चरणीं विनवणीं करून मी रजा घेतों. '

आपला सेवक

**गणेश केशव रेगे**

अमीन सुनेल ( होळकर स्टेट )

श्री

## ॥ साईनाथ प्रसन्न ॥

रा. रा. संपादक महाशय यांसी कृ. सा. न. वि. वि. बरेच दिवस मी स्वतःचे अनुभव पाठविण्याच्या विचारांत होतों पण पाठविण्याचें होत नसे. आज पाठवित आहे ते कृपा करून आपण आपल्या ' साईलीला ' मासिकामध्ये प्रसिद्ध करावे.

सन १९२२ पर्यंत मला साईबाबा कोण आहेत, कुठे असतात, काय करतात याची माहिती मुळींच नव्हती. एके वेळीं माझे एका मित्राने मला साईबाबांचे अध्याय वाचण्यास दिले, व कांहीं अनुभवही सांगितले. ते अध्याय वाचण्यास मी एके दिवशीं रात्रीं बसलों व सुमारे १२ वाजेपर्यंत ते वाचून माझ्या उशाशीं ठेऊन झोपीं गेलों. मी झोपेंत असतांना मला कोणीतरी या कुशीवरून त्या कुशीवर केल्याचा भास झाला व 'ऊठ, जागा हो ' असे कोणी तरी सांगत असल्यासारखे भासलें. मी दचकून जागा झालों. जवळ पास कोणी नव्हते. दिवा जवळ जळत होता. मनांत घाबरलोंही. दिव्याची वात मोठी करून पुन्हां झोंपी गेलों. पुन्हां तसेंच कोणी तरी आपणाकडे येण्यास सांगत आहे व मला या कुशीवरून त्याकुशीवर ढकलून दिलें. पुन्हां अंथरुणावर उठून बसलों. सर्व अंगास घाम सुटला. रामराम म्हणण्यास सुरवात केली. अर्धी झोपेंत व अर्धी जागृतीमध्यें कशी बशी रात्र घालविली. सकाळीं माझ्या मित्राला मी सर्व रात्रीची हकीकत सांगितली. ते म्हणाले, हें तुम्हाला ' साईबाबांचे बोलावणे आहे तरी आपण शिर्डीस जाऊं. त्याप्रमाणें आम्ही दोघे शिरडीस गेलों. शिर्डीस गेल्यानंतर तिकडच्या कांहीं मंडळींची व माझी ओळख करून दिली. समाधीचें व मशीदीचे दर्शन घेतले. माझें मन मुळींच स्थीर नव्हते. बाबा त्याच्या भक्ताकडून दक्षिणा म्हणून पैसे असतील

दुसरा दिवस उजाडला; नित्याप्रमाणे नोकरीवर जाण्याकरितां मी ९ वाजता जेवावयास बसलो. मातोश्रींना रात्रींच्या स्वप्नाची आठवण झाली त्या माझ्या समोर येऊन बसल्या व रात्रीचे स्वप्न सांगू लागल्या, कीं तूं जेवावयास बसला आहेस. मी तुझ्या समोर बसले आहे व इतक्यात पोष्टमन पत्र दारात टाकून गेला. इतके म्हणून झाले नाहीं तोंच पोष्टमन दारांत पत्र टाकून गेला. पत्र घरांत आणले. फोडून वाचले. लग्न नक्की ठरले. काय त्या वेळचा आनंद वर्णन करावा. ज्याचा त्यालाच माहीत. त्या दिवसापासून माझाही विश्वास बसला. मातोश्रींना नोटीशीचे उत्तर अनुकूल मिळाले. बाबाचे सत्व गेले नाहीं. आपले सत्व जाऊं न देता दुसऱ्या दिवशीं तर दुसऱ्या दिवशीं पत्र पाठवून दिले. त्या दिवसापासून आम्हीं कमी जास्त मानाने बाबांची भक्ति करण्यास सुरवात केली. त्यानंतर बरेच वेळा आम्हाला बाबांनीं कोणत्याना कोणत्या तरी उपायाने प्रसंगातून निभावून नेले व आपले साक्षीत्व कायम ठेवले.

आपला,

डोंबिवली — मोरेश्वर बाळकृष्ण चव्हाण

## श्रीयुत गजानन वामन प्रधान यांचा अनुभवः—

माझा मुलगा दत्तात्रय याला ऑगष्ट १९२७ च्या एके शनिवारीं थोडा ताप आला. ताप विशेष नसल्यामुळें सकाळीं औषध आणले नाहीं. मी ऑफिसांत गेल्यावर दुपारीं ताप जास्त भरला. शनिवार असल्यामुळें मी सुमारे ३॥-३॥। वाजतां घरीं परत आलों. दत्तात्रयाच्या अंगांत ताप होता, त्याचे कपाळ दुखत होते. त्यास घरगुती औषधोपचार करण्यांत आला होता. ४॥ च्या सुमारास मुलानें डोळे फिरवून घाबरे केलें. मुलगा दररोज सकाळीं उठल्यावर तोंड धुतल्यावर श्रीसाईनाथाच्या फोटोला नमस्कार केल्याशिवाय कांहीं खात नाहीं. ( मुलाचें वय फक्त ३ वर्षांचे आहे. ) घरांत जिकडे तिकडे रडारड सुरू झाली, डॉक्टरास बोलावून आणले. डॉक्टरने -॥- तास त्यास औषधोपचार केले व शेवटीं वातानें गांठल्यामुळे नाइलाज झाला. त्यामुळे मुलाची आई फार घाबरली. मी लगेच श्रीसाईनाथाची उदी मुलाच्या दांतखिळींत घातली व घाबरूं नका, श्रीसाईनाथ कृपा आहे तोंपर्यंत काळाचेही मुलाला भय नाहीं असे आमच्या सर्व मंडळींस सांगितलें. नंतर १५ मिनिटेपर्यंत मुलगा निचेष्टित मरणकालच्या शेवटल्या स्थितींत होता. १५ मिनिटानीं मुलगा सावध झाला. मुलगा सावध होतांच त्याने बाबांच्या फोटोकडे पाहून त्याना हांक मारली व हंसला.( उदीने गुण आला मग औषध कां ? ) सुमारें ४।५ तासांनीं मुलाला चांगलें बरें वाटून तो बोलूं चालू लागला. डॉक्टरमजकूर यानेही तुम्ही म्हणता ते तुमचे साईनाथ समर्थ आहेत हें प्रांजलपणे कबूल केले.

ह. भ. परायण रा. रा. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज यांचीं निवडक पदे.

पद

रमावरा! सजलजलदसम श्याम कमलनयना! धृ
धीरा! वीरा! रघुकुमरा!
दशकंधर-रिपु वायु-तनयपति कलिमथना १
निरंजना दयाघना जनार्दना
पीत वसन धृत कौस्तुभ, तूं हे परिपूर्णा २
चाप करीं, मुकुट शिरीं, शोभे हरी
मृग लांछन-तिल भाल भूषवी अघशमना ३
वारा सारा ताप खरा
पंढरिनाथा! अनंत शक्ते! दाव गणुस चरणा ४

पद

जय कमलावर दीन-जनोद्धर! भगवंता
भव-भय हें हर जय० धृ०
भीमातट-वासिया मुकुंदा
आनंद कंदा! जय गोविंदा!
हे शारङ्गधर ॥ जय०
ठेवुनियां समचरण विटेवरी
हात कटीवरि नित्य मुरारी
भो! अघमलहर! जय० २
दास गणू तव आस करी
नित भावें तुजप्रति शरणागत
जोडुनि द्वय कर जय० ३

पद

दीनोद्धारा परमोदारा आनंदकंदा माधवा
रुक्मिणिरमणा हे परिपूर्णा तव समचरणा केधवा धृ०
नकळे दाविसि हे हृषिकेशी
पंढरिवासा केशवा १
चा० श्रुति स्मृतीही कुंठित झाल्या
मौनें तुझिया पायीं लागल्या
भक्ति-सुधेला हे जगपाला
दासगणूला चाखवा २

पद

कमल नयन गिरिधारी, राम कमल० ॥
बार बार नरतनु नच लाधे
जावा नच वायां सदय भो कंसारी धृ०
कांठिं भिमेच्या वससि विटेवरि
ठेवुनियां निज हात कटीवरि
येवो दया गणुप्रति नित तारीं १

पद

त्रिविध ताप हे मागें असतां 'सुखि' अपणा मानिती
अशांची नको मला संगती ॥ धृ० ॥
पळ घटिका ज्यां लोभ सोडिना, मानधना इच्छिती अ० १
दर्दुरवत जे पंचशराच्या कर्दमांत लोळती अ० २
अष्टाष्टकि चोसष्टी पडला परि न पालटे मती अ० ३
सोंवळें ओंवळें दंभ रिकामा किल्मिष ज्याच्या चित्तीं अ० ४
हेतु धरूनी दर्भ घृताला अग्निमध्यें जाळिती अ० ५

वाटा मारुनि मान मिळाया भूत दया दाविती अ० ६
शांति न चित्तीं वरुनि रिकामीं द्वारावति फांसिती अ० ७
स्कंधिं पताका गळ्यांत माळा वर्तन नच त्या रितीं अ० ८
परनिंदा ती ऐकुनि ज्याच्या प्रमोद वाटे चित्तीं अ० ९
द्वेष लोभ तो सदैव ज्याचा उंबरठा राखिती अ० १०
दास गणु म्हणे या अवघ्यांच्या पासुन कमलापती
ठेवि मज दूर विनति तुजप्रती अ० ११

पद

पंढरपुरवासिनी विठाबाई ! अनंत सुख दायिनी
'उदो उदो बोला हो बया ही तापत्रय मर्दिनी धृ० ॥
भुवनत्रय व्यापुनी वसविलें ठाणें पंढरपुर,
सावळि बयेची मूर्ति विटेवरि, हात कटीच्यावर
दांत दाढा बहुत भयंकर आयुधें मंडित कर
मुख सिंहाचें धरुन विठाई स्तंभीं करि गुरगुर
कडकडला तो खांब चांदण्या पडल्या भूमीवर
डळमळलें ब्रह्मांड भयाभित झाले वरुण दिनकर
सवा हात ललळले जीभ तो वन्हि तृतिय लोचनीं
तैं प्रल्हादें गोंधळ घालुनि तुष्टविली ही क्षणीं १

याच आईनें विरोचनात्मज पाताळीं दडपिला,
अंजनी कुमरा हातिं बयेनें द्रोणाचल उचलिला,
इंद्रजीत, अतिकाया रावण मातीला मिळविला,
तीहि विठाई मनिं शबरीच्या इच्छीं उष्ट्या फळा.
वक्रदंत शिशुपाळ कंस तो मथुरेसी मर्दिला
वेडा वांकुडा पेंद्या गोंधळि कंठामध्ये बांधिला.

विठाईचे या बहुत गोंधळी वेद, नारदमुनी
उद्धव अक्रूर सुदाम, शबरी, गोकुळींच्या कामिनी २

नाथ मछिंद्र गोरख कानिफ, नामा, ज्ञानेश्वर,
तुलसीदास गुरु नानक एका मेहता जी नागर
मिरा, जनाई कबीर चोखा मुक्तेश्वर, श्रीधर
दामाजीनें मातच केली दाखविलें बेदर
समर्थ स्वामी संत शिरोमणि साधू देहूकर,
तुकाराम महाराज तयांचे गुण वानूं कुठवर,
कुर्मदास, सांवता बोधला, कुलाल गोरा गुणी
या संतांनीं हिला कोंडिलें गोंधळ घालुनि मनीं ३

म्हणुन व्हारे गोंधळी चला तो गोंधळ घालूं बरा
क्रोध बोकड बळी पाहिजे बयेस पंढरपुरा,
दृढ निश्चय हा अंगिं झगा तुण तुणे गुणाचें करा,
तेल आशेचे, वैराग्याचा पोतकरी तो धरा,
किर्ति रूपि संबळा वाजवा, भक्तिरसाला वरा
पदीं घुंगुरें निरीच्छेचीं, शांतिरुप मंजिरा
असे गोंधळी झाल्या येईल स्वभक्त-वर दायिनी,
रंगा तुमच्या, दासगणु म्हणे लाव बये! मज स्तनीं ४

पद

अनेकांचीं तीं अनेकांचीं अनेक मते तयानें चित्त व्यग्र होतें धृ०
कुणी म्हणतात म्हणतात निराकार असूनियां ईश निर्विकार
कुणी म्हणतात म्हणतात सगुण तुजला कुणी म्हणतात विश्वि भरला
तसें कुणी म्हणती कुणी म्हणति समूळ खोटें कशाचा ईश कर्म मोठें

परि इतुक्यांही इतुक्यांही तुझी जागा, कळलि ना काय पांडुरंगा,
सगुण निर्गण, निर्गूण सर्व कांहीं असति तूं एक विठाबाई,
तुझें दर्शन दर्शन जया होई, तया मग भेद उरत नाहीं,
तूंच कीं अवघा, अवघाहि रमारंगा, गणूला भेट पांडुरंगा अ० १

## पद

पंढरिनाथा त्वं शरणं रुक्मिणीकांता त्वं शरणं,
केशव माधव हरि नारायण अच्युत नरहरि त्वं शरणं
पंढरिबासा त्वं शरणं जगद्विलासा त्वं शरणं
सजलजलदसम-श्याम तनू धृत पीत पितांबर त्वं शरणं
नंदनंदना त्वं शरणं गोपरंजना त्वं शरणं
गोवर्धन धृत अघमलनाशक कुंजविहारी त्वं शरणं
कंसमर्दना त्वं शरणं पतित पावना त्वं शरणं
राधाधर-मधुमिलिंद-मुनिजन मानसहंसा त्वं शरणं
जानकिजीवन त्वं शरणं रघुकुल भूषण त्वं शरणं
गाधिजमुनि मखरक्षक राघव दशवदनांतक त्वं शरणं
मायातीता त्वं शरणं विमल चरित्रा त्वं शरणं
दीनजनोद्धर परमभक्त प्रियबहु विधवेषा त्वं शरणं
अनाथनाथा त्वं शरणं परमपवित्रा त्वं शरणं
धृत कटिकर श्रीपुंडलिक मुनिवरद दयाघन त्वं शरणं
जगद्व्यापका त्वं शरणं सौख्य दायका त्वं शरणं
समचरणीं नत दासगणू नित पालय विठ्ठल त्वं शरणं.

आपल्यास श्रीसाईबाबाचें "एक बाळ" म्हणविणाऱ्या एका भक्तानें श्रावण शके १८४८ चे श्रीसाईलीलेचे अंकात शिरडी संस्थानचे कायमनिधी समुच्चयासंबंधाने योजना म्हणून काहीं सूचना केल्या होत्या तेव्हां पासून आजवर त्यांचा अमल श्रीचे भक्तांकडून कितपत झाला आहे त्यांचे थोडे दिग्दर्शन केल्यास ते या मासिकाचे वाचकास अनाठायीं वाटणार नाहीं.

या सूचनात अशी एक सूचना होती कीं श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारानीं श्रीसाईलीलेच्या वार्षिक वर्गणीखेरीज करून शिवाय एक वर्ष पर्यंत दरमहा एक रुपया या कायमनिधिकारितां द्यावा कीं जेणेकरून एक वर्षात सहज कोणा एकावर विशेष बोजा न पडतां सुमारे ७ पासून ८ हजारापर्यंत निधि जमेल या सूचनेकडे श्रीसाईलीलेचे पुष्कळशा संपन्न वर्गणीदाराचे लक्ष गेले असेल असे दिसून येत नाहीं. नाहीं म्हणाला श्रीसाईलीलेचा एक गरीब पण भाविक वर्गणीदार मि० हरी गोपाळ सकपाळ याने मात्र कार्तिक शके १८४८ ते आश्वीन शके १८४९ पर्यंत रुपये १२ कायम निधीसाठीं भरलेले आहेत.

प्रत्येक साईभक्ताने आपल्या नैतिक मासिक वार्षिक उत्पन्नातून रुपयामागे एक अथवा अधिक पया या कायम निधीकरिता निरनिराळ्या काढून ठेवाव्या. अशी जी एक त्याच मासिकांत सूचना होती तीप्रमाणे कोणाकडून आपापल्या घरीं अशा निधीसाठीं पेट्या ठेवण्यात आल्या आहेत त्याची माहिती पुढे येईलच.

आणखी एक अशी ही सूचना होती कीं श्रीसाईभक्तांनीं व श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांनीं प्रत्येकीं आपापले घरीं प्रत्येक सण व दान, उद्यापन, उत्साह, कुलधर्म वगैरे प्रसंगीं या निधीकरितां शक्त्यनुसार काहीं तरीं रक्कम काढून ठेवून ती खजीनदाराचे हवालीं करावी. यासंबधाने गेल्या सहा महिन्यात ज्या थोड्या गृहस्थांनीं ज्या ज्या प्रसंगीं ज्या ज्या लहानसान रकमा दिल्या आहेत त्या येणे प्रमाणे.

( १ ) एक अधिक महिन्याचे वाण.

रु. १। एस. रमाबाई देव, रहाणार पिंपळनेर.

,, २ एस. जानकीबाई देव.

( २ ) इंग्रजी व मराठी विद्यारंभ.

रु. ३ एस. जानकीबाई देव.

( ३ ) मुलीचा वाढदिवस.

| | | |
|---|---|---|
| ता० ६–१–२७=१ | रुपया | सौ. अन्नपूर्णाबाई दामोदर बळवंत जोशी. |
| १२–२–२७=१ | ,, | ,, |
| १०–३–२७=१ | ,, | ,, |
| ८–४–२७=१ | ,, | ,, |
| १०–५–२७=१ | ,, | ,, |
| १५–६–२७=१ | ,, | ,, |
| १०–७–२७=१ | ,, | ,, |
| ४–८–२७=१ | ,, | ,, |

( ४ ) गाई प्रसूत होत असतां प्रदक्षिणेच्या श्रेयप्राप्तीचे गोप्रदान

रु. १। सौ. जानकीबाई देव

,, १। राधाबाई देव

,, १। श्रीनिवास बाळकृष्ण देव

,, १। श्रीपाद बाळकृष्ण देव

,, १। बी. व्ही. देव.

( ५ ) हारमोनियमचे अधिक कामाबद्दल

रु. १ वेणूताई आगाशे यांचा मुलगा

( ६ ) स्वयंपाकाचे कामीं अकल्पित लाभ

,, १ वेणूताई आगाशे

,, १। ,, ,,

,, १ ,, ,,

,, १। ,, ,,

,, १ ,, ,, मुलाचे लग्नाबद्दल

( ७ ) किरकोळ दक्षिणा.

,, -॥- श्रावणी— बी. व्ही. देव

,, -॥- गणेश चतुर्थी मंत्रजागर ,, ,,

,, १। लक्ष्मण महादेव भिडे मुंजीची दक्षिणा ,, ,,

,, १। श्रावणमास समाप्ति दक्षिणा ,, ,,

,, १ मातोश्री वर्षश्राद्ध दक्षिणा ,, ,,

,, १ महालयाचे खर्चापैकीं ,, ,,

,, १ मातामह श्राद्ध ,, ,,

,, -।- कोजागरी ,, ,,

,, ५ गुरु चरित्र समाप्ति रा. रा. वामन सावा केसरकर.

,, १॥ कांहीं धर्मकृत्य. मिसेस जानकीबाई देव

,, -।- वडिलांचे श्राद्ध. बी. व्ही देव

,, -।- दर्श अमावाशा ,, ,,

,, १॥ दत्तजयंती दक्षिणा व पूजासाहित्य दामोदर सदाशिव श्रोत्री

,, १५ रामचंद्र रामकृष्ण सामंत. मुलगा दुखण्यांतून बरा झाल्याबद्दल.

,, १ बयाबाई आगाशे मुलगी दुखण्यातून बरी झाल्याबद्दल.

,, -॥- एका गृहस्थास मुलगा झाल्याचे पेढ्याबद्दल

,, १॥- सौ० बयोताई लेले. मुलगा दुखण्यांतून बरा झाल्याबद्दल

,, १ सौ० बयाताई नेने सुरक्षित बाळंतपणा

,, २ रघुनाथ हरी वाटवे

,, ५ श्रीपाद बाळकृष्ण देव बी. ए. पासझाल्याबद्दल.

,, २ श्री. नरसिंह बाबा महाराज यांजपुढें बाळकृष्ण विश्वनाथ देव यांनीं ठेविलेली.

,, १८॥- श्रीसमोरील दक्षिणा.

५ शंकर रावजी खोपकर. आपल्या कन्येच्या सावत्सरीक निधनाचे दिवसाबद्दल.

-।≈।।। गोविंद रघुनाथ दाभोळकर देवपूजा दक्षिणा जुलै १९२७

-।≈।।। ,, ऑागस्ट ,,

२ मधुसूदन गणेश पेडसे. श्रीसाईनाथ कंपनी दक्षिणा.

-।- राजाराम केशव वालावल्कर भोजन दक्षिणा.

( ८ ) धंद्यांतील जास्त फायदा.

१ श्री. वेणूताई

५ द्वारकानाथ हरी देशमुख

२० श्रीपाद बाळकृष्ण देव यास संस्कृत लिहिण्याचे प्राविण्याबद्दल मिळालेल्या बक्षिसाचा भाग.

( ९ ) घरच्या पेट्यांचे उत्पन्न.

१॥ बी. व्ही. देव २ जानेवारी १९२७ ची पेटी.

२ ,, ,,

५ नरहर दिनकर फाटक.

२८-। बी. व्ही. देव.

१॥ मे ची पेटी

२।-॥ सदहू जून.

१।।।-।। जुलई पेटी

३।= आगष्ट ,,

५। सौ० राधाबाई विनायक प्रधान

९।।-।। रा० ब० एस. बी. धुमाळ

३।= ,, ,, ,,

४।।।-।१ ,, मोरेश्वरराव प्रधान पेटी

१८= सदर

५ शामराव जयकर पेटी

४८≡ नारायण रघुनाथ खानोलकदुकानची पेटी.

शके १८४८ चे फाल्गुनचे श्री साईलीलेचे अंकांत श्रेय व प्रेय यांचे दिग्दर्शन झालेले वाचून श्रेय काय हे कांहीं वाचकांस बरोबर समजले नाहीं, असे कळून आल्यावर त्याचे थोडे विस्तृत वर्णन येथे देत आहे.

श्रेय म्हणजे निःश्रेयस. हा अर्थ जरी खरा आहे तरी त्याचेही अजून स्पष्टीकरण पाहिजे आहे ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' म्हणजे ब्रह्मवस्तु काय तीं सत्य म्हणजे नित्य व यच्चावत् जगत् तेवढे मिथ्या म्हणजे असत्य व अनित्य हा सिद्धांत आहे. हे एवढे लक्षात ठेवलें म्हणजे मनुष्य जन्मास येऊन मोक्ष संपादन करणे हें अंतिम साध्य व अंतिम कल्याण आहे. व जे श्रेय ते हेंच.

श्रेय व प्रेय हीं एकमेकापासून फार वेगळीं आहेत. त्यांचीं प्रयोजनेहीं भिन्न आहेत. यापैकीं श्रेयाचा अवलंब करणाऱ्याचे कल्याण होते व प्रेयाचा अवलंब करणारा नरदेहास येऊन साधावयाच्या पुरुषार्थापासून च्युत होतो अभ्युदयाची इच्छा करणारा प्रेयाचे ठिकाणीं प्रवृत्त होतो व अमृत तत्त्वाची अर्थात् मोक्षाची इच्छा करणारा श्रेयामध्ये प्रवृत्त होतो. श्रेय हे विद्यारूप आहे व प्रेय हे अविद्यारूप आहे. आपण दोन्हीं साधूं असे म्हणणारास मोक्षाची प्राप्ति शक्य नाहीं. प्रेयाचा जो सर्वथैव त्याग करील त्यालाच श्रेय संपादिले जाईल.

**विवेक आणि अविवेकात्मक । मोक्ष आणि संसारजनक ॥**
**प्रकाश आणि तमोत्पादक । भिन्न विषयक हीं दोनी ॥**
**जया नांव आत्यंतिक कल्याण । श्रेय तयाचें आदिकारण ॥**
**प्रेय तितुके अधःपतन । पशु पुत्र लक्षण अनित्य ॥**

श्रेय हें तों अमृत फल । प्रेय इंद्रावण देखत भूल ॥
एक पीयूष दुजें विषमूल । करील निर्मूल स्वार्थाचें ॥
श्रेयाचा विषय विद्या । प्रेयाचा तो माया अविद्या ॥
एक उपनिषत्प्रतिपाद्या । दुजी सद्यः सुखकर ॥
आत्मस्वरूप सत्य ज्ञान । हेंच संसार निवृत्ति साधन ॥
परमानंद प्राप्ति कारण । येणेंच विस्मरण सुखदुःखा ॥

या एवढया विवेचनावरून आतां श्रेय व प्रेय यांची कल्पना वाचकांस चांगली होईल अशी उमेद आहे.

हेमाडपंत.

## अध्याय ४६ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

धन्य श्रीसाई तुझे चरण । धन्य श्रीसाई तुझें स्मरण ॥
धन्य श्रीसाई तुझे दर्शन । जें कर्मबंधन मोचक ॥ १ ॥

जरी सांप्रत अदृश्यमूर्ती । तरी धरितां भावभक्ति ॥
समाधिस्थ जागती ज्योती । सद्यःप्रतीती भक्तार्थ ॥ २ ॥

दोरी सूक्ष्म धरिसी ऐसी । पाहूं जातां दिसों ना देशी ॥
परी निजभक्तां खेंचून आणिशी । देशीं विदेशीं असो कीं ॥ ३ ॥

आणूनि सोडिसी पायापाशीं । प्रेमें धरिसी त्यां पोटाशीं ॥
माता जैसी निजबाळकासीं । तैसा तूं पोशिसी अवलीला ॥ ४ ॥

ऐसें कांहीं सूत्र चाळविसी । नकळे कोणा कोठें अससी ॥
परी परीणामीं वाटे मनासीं । आहस कीं पाठीसीं भक्तांच्या ॥ ५ ॥

ज्ञानी, पंडित शहाणे सुर्ते । अभिमानें रुतती संसारगर्ते ॥
भोळेभाबडे अज्ञानी नेणते । त्यां निजसत्ते खेळविसी ॥ ६ ॥

आंतून सकल खेळ खेळसी । अलिप्ततेचा झेंडा मिरविसी ॥
करोनि अकर्ता स्वयें म्हणविसी । नकळे कवणासीं चरित्र तुझें ॥७॥

म्हणोनि कायावाचा मन । करूं तूझिया पायीं अर्पण ॥
मुखीं निरंतर नामस्मरण । होईल क्षालन पापाचे ॥ ८ ॥

सकामाचा पुरवीसी काम । निष्कामा देसी निजसुखधाम ॥
ऐसें गोड तुझे नाम । उपायसुगम सद्भक्तां ॥ ९ ॥

तेणें पापांचा होईल क्षय । रजतमजातील निःसंशय ॥
सत्व गुणाचा क्रमें उपचय । धर्मसंचय त्यापाठीं ॥ १० ॥

धर्मवृत्ती होतां जागृत । वैराग्य येई मागें धांवत ॥
नामशेष विषय होत । तात्काळ प्रकटत निजज्ञान ॥ ११ ॥

विवेकेंसीं लाभतां ज्ञान । स्वस्वरूपीं अनुसंधान ॥
तेच गुरुपदीं अवस्थान । पूर्ण गुर्वर्पण या नांव ॥ १२ ॥

मन साईपदीं अर्पण । जाहलें याची एकच खूण ॥
साधक होय शांति प्रवण । उल्हासेंसंपूर्ण निजभक्ति ॥ १३ ॥

सप्रेम गुरुभक्ति या नाव धर्म । अवघा तो मीच हें ज्ञानवर्म ॥
विषयीं अरती वैराग्य परम । संसारा उपरम ते ठायीं ॥ १४ ॥

ऐसिया भक्तीचा महिमा धन्य । केलिया जीवेभावे अनन्य ॥
शांती विरक्ति कीर्ति या तीन । जियेच्या आधीन सर्वदा ॥ १५ ॥

गुरुभक्ति ऐसी जयासी । उणें कैचें तरी तयासी ॥
इच्छील जें जें अपुले मानसीं । तें तें अप्रयासीं लाधेल ॥ १६ ॥

ऐसिया त्या भक्तीपासीं । ब्रह्मस्थिति तो आंदणी दासी ॥
तेथें कोणी न मोक्षापुसी । तीथें पायासीं लागती ॥ १७ ॥

पूर्वील अध्यायीं जाहलें कथन । दीक्षितांचें भागवत वाचन ॥
नवयोगियांचें भक्तिवर्णन । चरणदर्शन साईचे ॥ १८ ॥

साई भक्त आनंदराव । पाखाडे जयालागीं उपनाव ॥
कथिलें तयांचे स्वप्न लाघव । भक्तीचें वैभव साईच्या ॥ १९ ॥
साई जयास घेती पदरीं । तो घरीं असो वा द्वीपांतरीं ॥
तया सन्निध अष्टौ प्रहरीं । वसे निर्धारी श्री साई ॥ २० ॥

भक्त जेथे जेथें जाई । तेथें तेथें कवण्याही ठायीं ॥
आधींच जाऊन उभा राही । दर्शन देई अकल्पित ॥ २१ ॥
ये अर्थीची अभिनव कथा । कथितों तुम्हां श्रोतयां करितां ॥
विस्मय वाटेल श्रवण करितां । आनंद चित्ता होईल ॥ २२ ॥
येथील साई मुखोचीं अक्षरें । भावें सेवितां श्रवणद्वारें ॥
समाधि सौख्य फिरे माघारे । स्वानंदें तरतरे सद्भक्त ॥ २३ ॥
जेथ प्रतिपदीं चमत्कारता । ऐसी ही गोड कथा परिसतां ॥
आप आपणा विसरेल श्रोता । अळोट गहिवरता दाटेल ॥ २४ ॥
काकासाहेब दीक्षितांचा । ज्येष्ठ पुत्र बाबू याचा ॥
नागपूरीं व्रतबंध साचा । करावयाचा निश्चय ॥ २५ ॥
नानासाहेब चांदोरकर तयांचाही ज्येष्ठ पुत्र ॥
तयाच्याही लग्नाचा विचार । जाणें ग्वाल्हेर शहरासीं ॥ २६ ॥
मौंजीबंधन झालीया पाठीं । ग्वाल्हेरीस लग्नासाठीं ॥
काकामुळे व्हावी न खोटी । होते हें पोटीं नानांच्या ॥ २७ ॥
नागपुराहूनि ग्वाल्हेरीस । काकानें यावें स्वस्थ मानस ॥
ऐसिया धरिले सुमुहूर्तास । जो कीं उभयतांस सोईचा ॥ २८ ॥
नंतर साईचे दर्शनास । लग्नाच्याही आमंत्रणास ॥
नानासाहेब भक्तावतंस[1] । पातले शिरडीस उत्साहें ॥ २९ ॥

---

१ भक्तांत श्रेष्ठ—भक्तमणी.